## र.ए. सोसायटीचे

# कै. पी.जी. अभ्यंकर कला व वाणिज्य आणि आर.बी. कुलकर्णी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी

# माहिती पुस्तिका २०२५-२०२६





संपर्क क्रमांक : ७५८८२६४३४८ फोन : (०२३५२) २२१३११

Email : akjcratnagiri@gmail.com Website : www.akjcrtn.ac.in

# प्राचार्य मनोगत

कोकणातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि रत्नागिरी सारख्या शहराची वैचारिक प्रगती होऊन तिचा चेहरा मोहरा बदलण्याच्या उद्देशाने मा. कै. श्री. बाबुराव जोशी आणि सौ. मालतीबाई जोशी यांनी या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. शंभर वर्षांपूर्वी नक्कीच अतिशय प्रतिकूल परिस्थितीत जोशी पती-पत्नींनी ही शिक्षणाची गंगा रत्नागिरी मध्ये आणली आणि रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या एकूण २३ घटक संस्थांमधून ही ज्ञानगंगा अगदी वेगाने प्रवाहित आहे. त्यातीलच एक **'अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय'**.

महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक धोरणानुसार अधिक दोन स्तरावर अभ्यासक्रम या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये १९७६ मध्ये सुरू झाला आणि आज हे कोकणातील अतिशय नामांकित महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. कला, विज्ञान, वाणिज्य, एमसीव्हीसी या चार विभागातील बारावीपर्यंतचे शिक्षण इथे उपलब्ध आहे. या कनिष्ठ महाविद्यालयात आज २८०० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अनुभवी आणि व्यासंगी प्राध्यापक वर्ग, तसेच प्रशस्त वर्गखोल्या, अद्ययावत प्रयोगशाळा, मोठे क्रीडांगण, उत्तम ग्रंथालय, अद्ययावत कम्प्युटर लॅब्स अशा सर्व भौतिक सुविधा विद्यार्थ्यांना इथे उपलब्ध आहेत. माहिती तंत्रज्ञान, कम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स हे विषय सुद्धा विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी उपलब्ध करून दिले आहे.

बदलत्या काळानुसार आणि विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजांनुसार प्रत्येक वर्गाचे सुयोग्य व्यवस्थापन व्हावे आणि प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत सहजपणे पोहोचता यावे यासाठी प्रत्येक वर्गाला वर्गशिक्षक आहेत. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना योग्य ते समुपदेशन करण्यासाठी शिक्षक मेंटॉर्स नेमले आहेत. प्रत्येक विभागामध्ये विभाग प्रमुख कार्यरत असून त्यांचा विद्यार्थ्यांशी आणि गरज पडल्यास पालकांशी वैयक्तिक संपर्क आहे.

कनिष्ठ महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या करिअरचा पाया आहे हे ओळखून त्यांच्या पुढील व्यावसायिक शिक्षणासाठी विज्ञान विभागात **'सुयश अकॅडमी'** हे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे.

विद्यार्थ्यांना शिक्षित, सुसंवादी आणि शहाणं करून जोशी दाम्पत्यांचा हा वारसा आम्ही पुढच्या पिढीकडे सुपूर्द करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

**डॉ. मकरंद साखळकर**
**प्राचार्य**

# ➤ कनिष्ठ महाविद्यालयाशी संपर्क साधण्यासाठी ➤

## महाविद्यालयाचा पत्ता


ॲड.एन.व्ही. जोशी मार्ग, जिल्हा सत्र न्यायालयाजवळ, रत्नागिरी ४१५६१२

फोन नं :- (०२३५२) २२१३११,  मोब. नं:- ७५८८२६४३४८

• Wesite: www.akjcrtn.ac.in • Email Id: akjcratnagiri@gmail.com


## संपर्क क्रमांक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्राचार्य | - | डॉ. मकरंद साखळकर | - | ९४२३०२२६४९ |
| उपप्राचार्य | - | श्री. सुनिल गोसावी | - | ९३७०३८६९९१ |
| पर्यवेक्षक | - | श्री. विद्याधर केळकर | - | ९४२११४३३०४ |

## विभाग प्रमुख

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कला | - | श्री. वैभव कानिटकर | - | ९४२०७३६८१३ |
| वाणिज्य | - | सौ. शिल्पा तारगांवकर | - | ८७९३८३१५०६ |
| विज्ञान | - | श्री. दिलीप शिंगाडे | - | ८४५९७९७७०० |
| MCVC | - | श्री. श्रीकांत दुदगीकर | - | ८२०८६६८८६५ |

## प्रवेश प्रक्रिया समन्वयक

श्री. मकरंद दामले - ९४२११४३३४३

# रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचा दैदीप्यमान प्रवास

कै. श्री. बाबुराव जोशी आणि सो. मालतीबाई जोशी यांनी शंभर वर्षांपूर्वी लावलेल्या शिक्षणरुपी रोपट्याचं आज मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाले आहे. शिक्षणाची गंगा तळागाळापर्यंत पोहोचवण्याचं काम सुरू केल्यावर या ध्येयवेड्या दांपत्याला सर्व व्यवस्था एकसंध करण्यासाठी एका योग्य छताची गरज निर्माण झाली आणि १९३३ साली त्यांनी रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. बदलत्या काळानुसार आणि विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजांनुसार रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीने स्वतःच्या रचनेमध्ये आवश्यक ते बदल करून विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिक्षण व्यवस्थांची सोय करून दिली. अगदी बालवाडी पासून ते पी.एच.डी. पर्यंतचे शिक्षण घेण्याची सोय इथे आहे. याचबरोबर काळ सुसंगत डेटा सायन्स तसेच मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन यांसारखं जागतिक पटलावर अधिराज्य गाजवण्यासाठी आवश्यक असलेल्या शिक्षणाची सोय देखील संस्था या वर्षापासून करत आहे. सोसायटीचा हा दैदीप्यमान प्रवास कोकणातील विद्यार्थ्यांसाठी आज दीपस्तंभ ठरतो आहे.

आज रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, विविध व्यावसायिक अभ्यासक्रम, प्रशिक्षण केंद्र मिळून एकूण २३ व्यवस्था कार्यरत आहेत. या सर्व ठिकाणी प्रशस्त वर्ग खोल्या, अद्ययावत प्रयोगशाळा, उत्तम ग्रंथालये, प्रशस्त क्रीडांगणे याचबरोबर अन्य सर्व शैक्षणिक सुविधा योग्य प्रकारे पुरविण्यात आल्या आहेत. या सर्व ठिकाणी शिक्षण देताना सर्व विद्यार्थ्यांना परवडेल अशा फी मध्ये त्यांना हवं असलेलं शिक्षण उत्तम प्रकारे देण्याचा संस्थेचा पूर्वापार चालत आलेला मुख्य हेतू प्रयत्नपूर्वक जपला गेला आहे.

आज पर्यंत जवळ जवळ चार लाख विद्यार्थ्यांना या विचारधारेचा फायदा झाला आहे.हजारो विद्यार्थ्यांसाठी सोसायटीचे हे शैक्षणिक आणि सामाजिक योगदान दरवर्षी कामी येत आहे. कोकणातील विद्यार्थी आपली आदर्श करिअरची स्वप्न पूर्ण करत आहेत. त्यांना आयुष्यात कायमस्वरूपी उपयोगी पडेल असे ज्ञान, विज्ञान, संस्कार आणि शहाणपणाचे धडे इथे मिळाल्यामुळे त्यांच्या आयुष्याला आपोआपच सोनेरी किनार प्राप्त झाली आहे. येथील विद्यार्थी संस्थेच्या कार्याबद्दल सतत कृतज्ञ राहत आलेला आहे.

आज बदलत्या काळानुसार जगाच्या नकाशावर रत्नागिरीचे नाव ठळकपणे अधोरेखित करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना अष्टपैलू बनवण्यासाठी आवश्यक त्या सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधांची आणि कौशल्य पूरक शिक्षणाची उपलब्धता करून देण्यामध्ये रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी सततच प्रयत्नशील आहे. याला अनुसरून भारतीय परंपरेतील गुरुकुल पद्धत पुनर्जीवित करण्यासाठी शक्य तिथे **गुरुकुल प्रकल्प** सुरू करण्यात आला आहे. तसेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी **अरुअप्पा जोशी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र** सुरू करण्यात आले आहे. जागतिक दर्जाचं इतर भाषांमधलं ज्ञान मिळवण्यासाठी आणि आपल्या भाषेतलं ज्ञान भाषांतरित करण्यासाठी म्हणून सोसायटी **फॉरेन लँग्वेज सेंटर** चालवते आहे. कोकणातल्या मागास भागातला विद्यार्थी देखील उत्तम प्रकारे तंत्रस्नेही बनण्यासाठी **बारटक्के इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी** जोमाने कार्यरत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच विविध कलांची ओळख आणि जाण निर्माण होण्यासाठी तसेच त्यामध्ये त्यांना नैपुण्य संपादन करता यावे म्हणून **यशवंतराव पटवर्धन संगीत अकादमी** ची स्थापना करण्यात आली आणि विद्यार्थ्यांना संगीताशी संबंधित नृत्य, गायन, वादन शिकण्याची संधी इथे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

याचबरोबर **आर. एस. पाध्ये शिवणकाम प्रशिक्षण केंद्राद्वारे** शिवणकाम देखील शिकवले जाते. त्यामुळे इथे अष्टपैलू विद्यार्थी घडत आहेत. भविष्याचा वेध घेऊन बदलणारे शैक्षणिक धोरण आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या दृष्टीने सुसज्ज सुविधा देऊन विद्यार्थी घडवण्यासाठी संस्था जोमाने कार्यरत आहे.

**कार्याध्यक्षा**
**रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी**

# कनिष्ठ महाविद्यालय प्रवेशासाठी पात्रता

## अ) इयत्ता ११ वी प्रवेशासाठी

**इयत्ता १० वी उत्तीर्ण**

**१)** गुणवत्ता निकष - महाविद्यालयाच्या तसेच शासनाच्या प्रवेश विषयक धोरणानुसार.

**२)** व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी गुणवत्ता निकष - महाविद्यालयाच्या तसेच शासनाच्या प्रवेशविषयक धोरणानुसार.

**३)** किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत (M.C.V.C.) मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन, अकौंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट, लॉजिस्टिक अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट, इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी या विषयांचा समावेश आहे.

**४)** व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये I) टेक्निकल II) संगणक शास्त्र (CS) III) इलेक्ट्रॉनिक्स (ET) IV) फिश प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी (FPT) असे शास्त्र विभागासाठी अभ्यासक्रम आहेत. या विभागात विद्यार्थ्यांची निवड गुणवत्तेवर व निवड प्रक्रियेनुसार होते. त्यामधील संगणक शास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स हे विषय विनाअनुदानित आहेत. त्या विषयांची वेगळी फी आहे.

**५)** शास्त्र व वाणिज्य शाखांमध्ये माहिती तंत्रज्ञान (IT) हा विषय विनाअनुदानित असून या विषयाची वेगळी फी आहे.

## ब) इयत्ता १२ वी प्रवेशाबद्दल

**१)** १२ वी चा प्रवेश ११ वी चा निकाल जाहीर झाल्यानंतर म्हणजे ताबडतोब दिला जाईल. त्यासाठी प्रवेश अर्ज व लागू असल्यास सवलतीचा अर्ज भरणे आवश्यक आहे.

**२)** ११ वी नंतर विद्यार्थ्यांचे नांव कमी करावयाचे असल्यास ३१ मे पर्यंत नांव कमी करावे अन्यथा जून महिन्याची फी भरावी लागेल.

# ११ वी प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या बाबी

**१)** इ. ११ वीच्या प्रवेशाच्या वेळी पाल्याबरोबर पालकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. (आई-वडील वा ज्येष्ठ पालक)

**२) अकरावीत प्रवेश घेताना विद्यार्थाने प्रवेश अर्जावर जे विषय नमूद केले असतील ते नंतर बदलता येणार नाहीत.**

**३)** शाळा सोडल्याचा मूळ दाखला. (या दाखल्याखेरीज कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाणार नाही) सदर दाखला हे कनिष्ठ महाविद्यालय सोडून जाईपर्यंत कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

**४)** ऑनलाईन अर्ज करताना हव्या असणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांसाठी बरोबर (√) अशी खूण  करावी.

**५)** महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या आपल्या पाल्याचा वर्ग, तुकडी, क्रमांक, तो कोणत्या शाखेत शिकत आहे ती शाखा याची नोंद पालकांकडे असणे गरजेचे आहे.

**६)** १२ वीच्या प्रवेशाच्या वेळी आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांच्या पालकांनी उपस्थित राहणे आवश्यक असल्यास तशी सूचना विद्यार्थ्यांना देण्याचा अधिकार प्रवेश समिती सदस्यांना आहे, याची पालकांनी नोंद घ्यावी.

**७)** शालांत परीक्षेचे / उच्च माध्यमिक इयत्ता ११ वी परीक्षेचे प्रत्येक विषयातील गुण दाखविणारे मूळ गुणपत्रक असणे आवश्यक आहे.

**८)** ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पेक्षा कमी असेल त्यांनी इ.बी.सी. फी माफीचा अर्ज व उत्पन्नाचा दाखला याची मूळ प्रत जोडावी. हा अर्ज प्रवेश अर्जाबरोबर द्यावयाचा आहे. हे सर्व प्रकारचे सवलतीचे अर्ज महाविद्यालयाच्या विद्यार्थी सहकार भांडारात मिळतील.

**८ अ)** फी माफीचा अर्ज विद्यार्थ्याच्या वडिलांनी करावयाचा आहे. ते हयात नसल्यास आईने, आई वडील दोन्ही हयात नसल्यास पालकाने व पालक नसल्यास स्वतः विद्यार्थ्याने करावा व त्याप्रमाणे योग्य ती बरोबर माहिती प्रवेश अर्जात नमूद केली पाहिजे.

**८ ब)** आई-वडील अगर पालक राज्य सरकारी नोकरी करत असल्यास ज्या ठिकाणी नोकरीत आहेत तेथील ऑफीस प्रमुखाचा पगाराबद्दलचा दाखला असला पाहीजे. शासकीय नोकराच्या बाबतीत मूळ पगार (Basic Pay) नमूद करावयाचा आहे. मात्र खाजगी नोकरी करीत असल्यास संपूर्ण पगार नमूद करावयाचा आहे.

**९)** कनिष्ठ महाविद्यालयास शासन नियमानुसार विषयनिहाय मंजूर आणि उपलब्ध अध्यापक वर्ग तसेच प्रत्येक तुकडीतील शासकीय नियमांनुसार ठरवुन दिलेली विद्यार्थीसंख्या आणि त्यानुसार प्रत्येक तुकडीत कोणते विषय शिकविण्यासाठी सोय उपलब्ध करण्यात आली आहे, त्याचा संपूर्ण तपशील पुढे दिलेला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी आपले विषय निश्चित करावेत. गुणानुक्रमानुसार एखाद्या तुकडीतील विद्यार्थीसंख्या पूर्ण भरली असल्यास, कनिष्ठ महाविद्यालयाकडून जे विषय घेण्यासाठी व ज्या तुकडीत प्रवेश घेण्यासाठी सुचविले जाईल तेथे व त्या तुकडीतच प्रवेश घेणे बंधनकारक राहिल.

**१०)** मागासवर्गीय शिष्यवृत्तीसाठी किंवा फी-माफीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सेतू मार्फत सक्षम प्राधिकाऱ्याच्या सहीचा जातीचा दाखला व पालकांचा मागील आर्थिक वर्षाचा सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचा दाखला सेतू मार्फत मा. तहसिलदार यांचे सहीचा प्रवेश अर्जासोबत वेळीच द्यावयाचा आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कोणतीही फी आकारली जात नाही. मात्र यासाठी प्रवेशावेळी फी माफीसाठी योग्य ती कागदपत्रे देणे आवश्यक आहे. याची विद्यार्थी / पालक यांनी नोंद घ्यावी.

**११)** मोफत शैक्षणिक सवलतीस पात्र असणाऱ्या मुलींनी फी सवलतीसाठी करावयाचा विहित नमुन्यातील अर्ज प्रवेश अर्जासोबत प्रवेशाच्यावेळी भरुन द्यावयाचा आहे फी सवलतीचे आवश्यक ते अर्ज प्रवेश अर्जासोबत देणे आवश्यक आहे. ते न दिल्यास त्याची जबाबदारी विद्यार्थी / पालक यांच्यावर राहील. वेळेवर कागदपत्रे न दिल्यास फी माफीची सवलत न मिळाल्यास सर्व फी भरावी लागेल व त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची/ पालकांची असेल.

*** फी माफी / शिष्यवृत्ती संदर्भातील सूचना -** इतर मागासवर्गीय / मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी सवलत घेताना खालीलप्रमाणे दाखले तयार करुन घेणे गरजेचे आहे. उत्पन्नाचा दाखला हा तहसिलदार यांचाच असावा. नॉन क्रिमिलेयर दाखला, डोमिसाईल दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड इ. दाखले महाविद्यालय सुरु झाल्यानंतर लगेचच सेतू कार्यालयामार्फत काढून घ्यावे, राष्ट्रीयकृत बँकेचे खाते काढून आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न करुन ठेवणे आवश्यक आहे, ह्याची सर्व शिष्यवृत्ती धारकांनी नोंद घ्यावी.

*** <u>कोणत्याही विद्यार्थ्याचा प्रवेश नाकारण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे.</u>**

*** शासनाच्या आरक्षण नियमानुसार संबंधित विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश दिला जातो. सर्व शासकीय फी विषयक व इतर सवलती उपलब्ध आहेत याची संबंधितानी नोंद घ्यावी.**

*** फी भरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी :** महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर शैक्षणिक फी नियमानुसार वेळेवर भरणे आवश्यक आहे. ती न भरल्यास किंवा न भरण्याचे सबळ कारण न दाखविल्यास संबंधित विद्यार्थ्याचा महाविद्यालयातील प्रवेश रद्द होऊ शकेल व त्याबाबतीत मागाहून कोणतीही तक्रार अगर सबब यांचा विचार केला जाणार नाही.

*** दुसऱ्या सत्राच्या नूतनीकरणासंबंधी :** दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीला पहिल्या सत्रात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना नूतनीकरण करणे आवश्यक असते. हा फॉर्म कार्यालयात मिळतो.

दुसऱ्या सत्राच्या प्रारंभी ठरवून दिलेल्या वेळात प्रवेश नूतनीकरण करणे आवश्यक आहे. दिलेल्या मुदतीत विद्यार्थी / विद्यार्थिनीने नूतनीकरण न केल्यास त्याने / तिने कनिष्ठ महाविद्यालय सोडले आहे असे समजून त्याचे / तिचे नांव कनिष्ठ महाविद्यालयातून वेगळी सूचना न देता कमी केले जाईल व त्याची जबाबदारी संबंधितावर राहील.

*** पालकांनी वेळोवेळी कनिष्ठ महाविद्यालयात येऊन विभाग प्रमुखांना भेटणे अत्यावश्यक आहे.**

*** महाविद्यालयातील प्रवेश रद्द करताना -** कनिष्ठ महाविद्यालय सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी तशा आशयाचा पालकांच्या सहीचा अर्ज प्राचार्यांकडे पाठविणे आवश्यक आहे. (महाविद्यालय सोडत असल्याचे लेखी कळविणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी). महाविद्यालय सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुढील ३ वर्षाच्या आत आपली अनामत रक्कम परत घेण्याची व्यवस्था करावी. या मुदतीनंतर रक्कम परत दिली जाणार नाही. विद्यार्थ्यांकडून येणे असलेली सर्व प्रकारची रक्कम अनामत रकमेतून वळती करण्याचा अधिकार महाविद्यालयाला आहे.

आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग, प्राथमिक शिक्षकांची मुले, स्वातंत्र्यसैनिकांची मुले, माजी सैनिकांची मुले, मागासवर्गीय विद्यार्थिनी इत्यादींना मिळणाऱ्या फी सवलतीपैकी कोणत्याही विद्यार्थ्याने मध्येच महाविद्यालय सोडल्यास तो ज्या सहामाहीत महाविद्यालय सोडेल, त्या सहामाहीची संपूर्ण फी त्याला भरावी लागेल.

* **अध्यापक वर्ग** : कॉलेजचा अध्यापक वर्ग अनुभवी व व्यासंगी असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे खास लक्ष पुरवितो. त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा. विद्यार्थ्यांनी न समजलेल्या अभ्यासविषयक व्यक्तिगत शंका शिक्षकांना विचाराव्या ही अपेक्षा आहे.

* **कै. बाबुराव जोशी ग्रंथालय अभ्यासिका :** कॉलेजच्या इमारतीनजीकच ग्रंथालयाची भव्य इमारत असून ग्रंथालयात विपुल ग्रंथसंग्रह असून निरनिराळी नियतकालिके व वृत्तपत्रे घेतली जातात. ग्रंथालयात अभ्यासिकाही आहे. त्याचा वापर विद्यार्थ्यांनी करावा ही अपेक्षा आहे. प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात प्रवेशाची नोंद करणे आवश्यक आहे. ग्रंथालय कार्डावर ग्रंथपालांची सही असणे आवश्यक आहे.

* **क्रीडा विभाग, एन.सी.सी., एन.एस्.एस्., विविध गुणदर्शन :** महाविद्यालयासमोर विस्तीर्ण क्रीडांगण असून तज्ज्ञ क्रीडाशिक्षक विविध खेळांचे मार्गदर्शन करतात. एन्.सी.सी. (Naval, Army) व एन.एस्.एस्. ची सोय आहे. वक्तृत्व, लेखन, नाट्य इत्यादी गुणांच्या विकासासाठी विविध कार्यक्रम व स्पर्धा आयोजित करण्यात येतात आणि वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते. तसेच शारीरिक शिक्षणाची वर्षअखेर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे पर्यावरण प्रकल्प, क्षेत्र अभ्यास प्रकल्प, विषय-गटनिहाय प्रकल्प पूर्ण करणे वार्षिक निकालासाठी अनिवार्य आहे.

* **कमवा व शिका (आर्थिक सहाय्य विद्यार्थी सहाय्यता निधी) :** या निधीतून कनिष्ठ महाविद्यालयातील अत्यंत गरीब, होतकरु व सद्वर्तनी विद्यार्थ्यांसाठी काही आर्थिक सहाय्य मिळण्याची व्यवस्था आहे. या योजनेचा फायदा घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्ज करावयाचा आहेः या विषयी सूचना, सूचनाफलकावर प्रदर्शित केली जाते.

* **विद्यार्थी कल्याण निधी :** विद्यार्थी कल्याण निधीचा विनियोग मुख्यतः सर्व विद्यार्थ्यांना 'विद्यार्थी सुरक्षा विमा योजनेत' समाविष्ट करुन घेण्यासाठी करण्यात येतो. या संबंधीचा आवश्यक तपशील प्रवेशाच्या वेळी मिळेल. सर्व विद्यार्थ्यांचा सुरक्षाविषयक विमा महाविद्यालयातर्फे उतरला जातो.

* **समुपदेशन** : एकाग्रता, अभ्यासातील अडचणी, सातत्याने येणारे अपयश, व्यसनाधिनता, नातेसंबंधातील तणाव, चिंता या व अशा अनेक समस्यांवर विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन सुविधा उपप्राचार्य, पर्यवेक्षक, विभाग प्रमुख, वर्गशिक्षक आणि मेंटॉर्स स्तरावर उपलब्ध आहे.

* **अत्यंत महत्वाचे : विद्यार्थ्याने प्रत्येक सत्रात प्रत्येक विषयाला किमान ७५ टक्के उपस्थिती ठेवणे आवश्यक आहे. जर विद्यार्थी दिवसाच्या तासापैकी कोणत्याही एक किंवा अधिक तासांना परवानगीशिवाय अनुपस्थित आढळल्यास त्याची संपूर्ण दिवसाची अनुपस्थिती मांडली जाते. पहिल्या सत्रातील उपस्थिती, अभ्यासातील प्रगती व वर्तणूक समाधानकारक नसल्यास दुसऱ्या सत्रातील प्रवेश नाकारला जाऊ शकतो. उपस्थिती संदर्भातील सदर अट मागासवर्गीय शिष्यवृत्ती तसेच फी माफी साठी शासनाने बंधनकारक केली आहे.**

दोन्ही सत्रातील एकूण हजेरी असमाधानकारक आढळल्यास त्या विद्यार्थ्याला वार्षिक / बोर्डाच्या परीक्षेला बसू दिले जात नाही. त्याचप्रमाणे ट्युटोरिअल्स, प्रकल्प, सहामाहीत व इतर परीक्षेत असमाधानकारक प्रगती आढळल्यास वार्षिक परीक्षेस बसू दिले जाणार नाही व त्याची सर्व जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यावर असते याची नोंद घ्यावी.

* **पालकांसाठी सूचना :** पालकांना आपल्या पाल्याची प्रगती कळावी म्हणून प्रगती पुस्तके देण्यात येतात. पालकांनी ती पूर्ण वाचून आणि पाहून स्वाक्षरी करावी. तसेच वेळोवेळी प्राचार्याशी /उपप्राचार्याशी/ पर्यवेक्षकांशी संपर्क साधावा. आपल्या पाल्याच्या महाविद्यालयातील उपस्थितीबाबतही पालकांनी सातत्याने उपप्राचार्य / पर्यवेक्षकांशी / विभाग प्रमुखांशी / वर्ग शिक्षकांशी संपर्क साधणे गरजेचे आहे.

पालकांनी (सुट्टीचे दिवस सोडून) आपल्या पाल्याच्या उपस्थिती संदर्भात व असमाधानकारक प्रगतीच्या संदर्भात प्रगतीपत्रक मिळताच वेळीच पर्यवेक्षक / विभाग प्रमुख / उपप्राचार्य यांना भेटून माहिती घ्यावी.

* **उपप्राचार्यांना/ पर्यवेक्षकांना/ विभागप्रमुखांना भेटण्याची वेळ कामाच्या दिवशी दुपारी ३.०० ते ४.०० अशी निश्चित केलेली आहे. कृपया पालकांनी या वेळेतच भेटावे.**

* **प्राचार्यांना भेटण्याची वेळ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पूर्व परवानगीने वा दररोज सायंकाळी ४.३० ते ५.३० वाजेपर्यंत.**

* **कनिष्ठ महाविद्यालयामध्ये येणाऱ्या पालकांनी प्राचार्यांना भेटण्यापूर्वी प्रबंधक यांना भेटावे.**

आपल्या पाल्याचा महाविद्यालयीन प्रवेश झाल्यानंतर त्याचा वर्ग, तुकडी व हजेरीक्रमांक याची स्वतःजवळ नोंद ठेवावी. पूर्व परीक्षेपर्यंत पालकांनी पाल्याचे प्रगती संदर्भात प्रत्येक महिन्याच्या कामकाजाच्या शेवटच्या दिवशी **दुपारी ३.०० ते ४.००** या वेळात पर्यवेक्षक / उपप्राचार्य यांना आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष भेटावे व प्रत्यक्ष चर्चा करावी. यासाठी दूरध्वनीचा संपर्कासाठी वापर टाळणे पाल्याच्या हिताचे आहे.

* **ओळखपत्र :** प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र महाविद्यालयात / ग्रंथालयात /महाविद्यालयाच्या परिसरात असताना स्वतःजवळ सतत बाळगणे आवश्यक आहे. ओळखपत्र नसल्यास त्या विद्यार्थ्याला महाविद्यालयात/ ग्रंथालयात/ वर्गात/ क्रीडांगणावर इत्यादी ठिकाणी प्रवेश नाकारला जाऊ शकेल. त्याचप्रमाणे महाविद्यालयात शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांनी विचारणा केल्यास ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे. सदर ओळखपत्र मुख्य गेटवर असणाऱ्या गेटमनला दाखविल्यानंतर महाविद्यालयाच्या आवारात प्रवेश करता येईल. **तसेच प्रवेशाच्यावेळी सांगितलेल्या महाविद्यालयीन ड्रेसकोडचे पालन करणे आवश्यक आहे.**

* **मोबाईल वापर - महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांना मोबाईल वापरण्यास सक्त मनाई आहे.**

* **जात पडताळणी संदर्भात महत्वाची सूचना**

इयत्ता १२ वी विज्ञान वर्गात शिकणाऱ्या व वैद्यकीय / अभियांत्रिकी / आर्कीटेक्चर या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती /विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागास प्रवर्ग / इतर मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात पडताळणी करणे आवश्यक असते.

अशा विद्यार्थ्यांसाठी जात पडताळणी समिती कार्यालयामार्फत महाविद्यालयात शिबिर आयोजित करुन त्यांचे अर्ज स्विकारले जातात. तशा प्रकारची सूचना योग्य वेळी महाविद्यालयात प्रदर्शित करण्यात येते. याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

# उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम (MCVC)

**आमच्या कनिष्ठ महाविद्यालयात केंद्रशासन पुरस्कृत अधिक दोन स्तरावरील किमान कौशल्यावर आधारीत खालील व्यवसायिक अभ्यासक्रम शिकविले जातात.**

**१) अकौंटिंग ॲन्ड ऑफिस मॅनेजमेंट (AOM)**
**२) मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी (M.L.T)**
**३) लॉजिस्टिक अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट (LSM)**
**४) इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी (E.T.)**

*** या अभ्यासक्रमांचे महत्व व ठळक वैशिष्ठ्ये खालील प्रमाणे -**

**अ) किमान शैक्षणिक अर्हता- 10 वी पास.**

**ब) प्रवेश क्षमता - प्रत्येक अभ्यासक्रमाकरिता फक्त 25 विद्यार्थी.**

**क) प्रवेशासाठी निकष - गुणवत्तेवर आधारीत.**

**ड) प्रात्यक्षिक ज्ञान -**

1) विविध औद्योगिक, व्यावसायिक, सेवाभावी संस्थांना प्रत्यक्ष भेटी.
2) प्रोजेक्ट (प्रकल्प)
3) तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने.
4) शिकाऊ उमेदवारी कायद्यानुसार अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर शिकाऊ उमेदवारीची तरतुद.
5) शिकाऊ उमेदवारी कालावधीत सरकारी नियमानुसार विद्यावेतन मिळण्यास पात्र.

**ई) स्वयंरोजगार -** अभ्यासक्रम पूर्ततेनंतर विद्यार्थी आपला स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी स्वयंसिद्ध होतात.

**फ)** वाणिज्यविषयक व्यावसायिक अभ्यासक्रमानंतर प्रथम वर्ष वाणिज्य (F.Y.B.Com), B.Com. with Management Studies, बी. कॉम. विथ अकौंटिंग ॲन्ड फायनान्स, तसेच B.P.A. ला प्रवेश मिळू शकतो. M.L.T. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर (F.Y.B.A./ F.Y.B.Sc) या वर्गात प्रवेश मिळू शकतो. तसेच वरीलपैकी सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना 12 वी नंतर. B.B.A. आणि पाच वर्षीय एल्.एल्.बी. (L.L.B) अभ्यासक्रमास प्रवेश मिळू शकतो.

**ग)** या अभ्यासक्रमांतर्गत कॉम्प्यूटर प्रशिक्षणाची (सशुल्क) आवश्यकतेनुसार सोय उपलब्ध.

**घ)** पदवी अभ्यासक्रमासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील विद्यार्थ्यांना नियमानुसार प्रवेश उपलब्ध आहे.

| LOGISTIC & SUPPLY CHAIN MANAGEMENT (PSK) | |
|---|---|
| **XI**<br>1. English<br>2. Foundation Course<br>3. Marathi/ Hindi<br>4. Pr.I - Purchase Management<br>5. Pr.II – Banking Insurance & Financial Services<br>6. Pr.III – Transport Management | **XII**<br>1. English<br>2. Foundation Course<br>3. Marathi/ Hindi<br>4. Pr.I - Retail Management<br>5. Pr.II – Security & Safety Equipments<br>6. Pr.III – Supply Chain Management |
| **MEDICAL LABORATORY TECHNOLOGY** | |
| **XI**<br>1. English<br>2. Foundation Course<br>3. Marathi/ Hindi<br>4. Pr.I – Anatomy & Physiology<br>5. Pr.II – Laboratory Management Ethics<br>6. Pr.III – Microbiology | **XII**<br>1. English<br>2. Foundation Course<br>3. Marathi/ Hindi<br>4. Pr.I – Clinical Haematology, Pathology & Blood Banking<br>5. Pr.II – Histotechnology<br>6. Pr.III – Clinical Biochemistry |
| **ELECTRONICS TECHNOLOGY** | |
| **XI**<br>1. English<br>2. Foundation Course<br>3. Marathi/ Hindi<br>4. Pr.I – Basic Electricity<br>5. Pr.II – Basic Electronics<br>6. Pr.III – Digital Electronics | **XII**<br>1. English<br>2. Foundation Course<br>3. Marathi/ Hindi<br>4. Pr.I – Appllied& Industrial Electronics<br>5. Pr.II – Modern Instruments & Communication System<br>6. Pr.III–Computer Hardware & Networking |
| **ACCOUNTING & OFFICE MANAGEMENT:(ACCOUNTING & AUDITING)** | |
| **XI**<br>1. English<br>2. Foundation Course<br>3. Marathi/ Hindi<br>4. Pr.I – Office Management & Organisation<br>5. Pr.II – Fundamentals of Accounting<br>6. Pr.III – Fundamentals of Costing & Auditing | **XII**<br>1. English<br>2. Foundation Course<br>3. Marathi/ Hindi<br>4. Pr.I – Office Motivation & Automation<br>5. Pr.II – Advanced Financial Accounting<br>6. Pr.III – Advanced Costing & Auditing |

## इ. ११ वी १२ वी कला / वाणिज्य / विज्ञान या शाखांतर्गत तुकडी निहाय विषय तक्ता

## कला / वाणिज्य / विज्ञान या शाखांमध्ये शिकविले जाणारे विषय

| कला शाखा XI/XII | | |
|---|---|---|
| अ (अनुदानित) | ब (अनुदानित) | क (अनुदानित) |
| मराठी माध्यम<br>१) इंग्रजी<br>२) मराठी<br>३) हिंदी/संस्कृत<br>४) समाजशास्त्र<br>५) मानसशास्त्र / भूगोल<br>६) अर्थशास्त्र<br>७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण | मराठी माध्यम<br>१) इंग्रजी<br>२) मराठी<br>३) हिंदी<br>४) इतिहास<br>५) मानसशास्त्र / भूगोल<br>६) अर्थशास्त्र<br>७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण | मराठी माध्यम<br>१) इंग्रजी<br>२) मराठी / उर्दू<br>३) हिंदी<br>४) भूगोल<br>५) समाजशास्त्र / इतिहास<br>६) अर्थशास्त्र<br>७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण |

<table>
<tr><th colspan="6">विज्ञान शाखा XI/XII</th></tr>
<tr><td>अ (अनुदानित)</td><td>ब (अनुदानित)</td><td colspan="2">क (अनुदानित)</td><td>ड (अनुदानित)</td><td>इ<br>(अंशतःअनुदानित)</td></tr>
<tr><td rowspan="4">१) इंग्रजी<br>२) भौतिकशास्त्र<br>३) रसायनशास्त्र<br>४) गणित<br>५) जीवशास्त्र/ कॉम्प्यु. साय I/ इलेक्ट्रानिक्स I<br>६) संस्कृत/ मराठी/ हिंदी/कॉम्प्यु. साय II/ इलेक्ट्रानिक्स II<br>७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण</td><td rowspan="4">१) इंग्रजी<br>२) भौतिकशास्त्र<br>३) रसायनशास्त्र<br>४) गणित / भूगोल<br>५) जीवशास्त्र<br>६) मराठी / हिंदी / संस्कृत / उर्दू<br>७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण</td><td colspan="2">१) इंग्रजी<br>२) भौतिकशास्त्र<br>३) रसायनशास्त्र</td><td rowspan="4">१) इंग्रजी<br>२) भौतिकशास्त्र<br>३) रसायनशास्त्र<br>४) गणित<br>५) जीवशास्त्र<br>६) आय.टी.<br>७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण</td><td rowspan="4">१) इंग्रजी<br>२) भौतिकशास्त्र<br>३) रसायनशास्त्र<br>४) गणित / भूगोल<br>५) जीवशास्त्र<br>६) मराठी / हिंदी / संस्कृत / उर्दू<br>७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण</td></tr>
<tr><td>Tech. Group</td><td>FPT Group</td></tr>
<tr><td>४) गणित<br>५) MM 1/EM 1<br>६) MM 2/EM 2</td><td>४) जीवशास्त्र<br>५) FPT 1<br>६) FPT 2</td></tr>
<tr><td colspan="2">७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण</td></tr>
</table>

| वाणिज्य शाखा - XI/XII | | | |
|---|---|---|---|
| अ (अनुदानित)<br>(इंग्रजी माध्यम) | ब (अनुदानित)<br>(मराठी माध्यम) | क (अनुदानित)<br>(इंग्रजी माध्यम) | ड (स्वयंअर्थसहाय्यित)<br>(इंग्रजी माध्यम) |
| १) इंग्रजी<br>२) अर्थशास्त्र<br>३) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन<br>४) गणित/ चिटणीसाचा व्यवसाय<br>५) अकौंटंसी<br>६) मराठी / हिंदी / संस्कृत / आय.टी.<br>७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण | १) इंग्रजी<br>२) अर्थशास्त्र<br>३) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन<br>४) चिटणीसाचा व्यवसाय<br>५) अकौंटंसी<br>६) मराठी / उर्दू<br>७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण | १) इंग्रजी<br>२) अर्थशास्त्र<br>३) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन<br>४) गणित/ चिटणीसाचा व्यवसाय<br>५) अकौंटंसी<br>६) मराठी / हिंदी / उर्दू / संस्कृत / आय.टी.<br>७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण | १) इंग्रजी<br>२) अर्थशास्त्र<br>३) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन<br>४) गणित/ चिटणीसाचा व्यवसाय<br>५) अकौंटंसी<br>६) मराठी /हिंदी<br>७) पर्यावरण<br>८) शा. शिक्षण |

**सूचना -**

**१)** टेक्निकल विषयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दोन दिवस राजिवडा येथे शासकीय संस्थेत थिअरी व प्रॅक्टीकलसाठी जावे लागते.

**२)** आय. टी., इलेक्ट्रॉनिक्स व कॉम्प्युटर सायन्स हे विषय विनाअनुदानित असल्याने त्यांची वेगळी फी भरावी लागते. प्रवेशाच्या वेळी त्याची माहिती घ्यावी.

**३)** अकरावी व बारावी विज्ञान 'इ' या तुकड्या अंशतः अनुदानित असल्याने प्रवेश घेताना वेगळी फी भरावी लागेल.

**४)** अकरावी वाणिज्य 'ड' व बारावी वाणिज्य 'ड' या तुकड्या स्वयंअर्थसहाय्यीत असल्याने प्रवेश घेताना वेगळी फी भरावी लागेल.

**५)** ११ वी आणि १२ वी च्या कला, विज्ञान, वाणिज्य आणि एम.सी.व्ही.सी विभागातील विद्यार्थ्यांना पर्यावरण आणि शारीरिक शिक्षण हे विषय अनिवार्य आहे.

**६)** वह्या, प्रोजेक्ट फाईल्स, ॲप्रन, जर्नल्स महाविद्यालयाच्या विद्यार्थी भांडारातून उपलब्ध करुन दिल्या जातील.

**७) कनिष्ठ महाविद्यालयातील विविध प्रकारच्या दाखल्यांची विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारी फी पुढील प्रमाणेः-**

Bonafide Certificate - ₹ 20/-,
No Objection Certificate - ₹ 50/-,
Attendence Certificate - ₹ 50/-
Any Other Certificate - ₹ 50/-,
Duplicate Marklist - ₹ 100/-,
First Attempt Certificate - ₹ 100/-,
Character Certificate - ₹ 50/-,
Medium Instruction Certificate - ₹ 100/-,
Duplicate Leaving Certificate - ₹100/-,
Duplicate Identity Card - ₹ 100/-

## Abhyankar Kulkarni Junior College, Ratnagiri
## Arts, Commerce and Science Grantable & Non-Grantable
## Fee Chart 2025-26

| Class | SC/ST/ OBC/NT/SBC/VJ/ Free-Education / SSTC / PTC / Ex-Serviceman | Paying |
|---|---|---|
| XI Arts Grantable | 2820 | 3060 |
| XII Arts Grantable | 2770 | 3022 |
| | | |
| XI Science General Grantable | 2870 | 3180 |
| XI Science C.S. / Electronics | 14380 | 14380 |
| XI Science I.T. Subject | 7870 | 8180 |
| XI Science General (Non Grant) | 12870 | 13180 |
| XI Science FPT | 4380 | 4380 |
| | | |
| XII Science General Grantable | 2770 | 3092 |
| XII Science C.S. / Electronics | 14292 | 14292 |
| XII Science I.T. Subject | 5170 | 5492 |
| XII Science General (Non Grant) | 12770 | 13092 |
| XII Science FPT | 4292 | 4292 |
| | | |
| XI Commerce Grantable | 2820 | 3060 |
| XI Commerce I.T. Subject | 7820 | 8060 |
| XI Commerce (Non Grant) | 11820 | 12060 |
| XII Commerce Grantable | 2770 | 3022 |
| XII Commerce I.T. Subject | 5170 | 5422 |
| XII Commerce (Non Grant) | 11770 | 12022 |
| | | |
| XI MCVC | 3470 | 3850 |
| XII MCVC | 3370 | 3820 |

Note : 1. The Fee Structure likely to be revised by Education office.
2. Above fees include Society Development fees Rs. 2000/- for XI Classes & RPT fees Rs.2000 for XII classes.

## कनिष्ठ महाविद्यालयाची वेळ

**शास्त्र / कला / वाणिज्य / एम्.सी.व्ही.सी. या सर्व विभागांचे ११ वी / १२ वी चे सर्व वर्ग दुपारी १२. ३० पासून सुरु होतील. सर्व वर्गांचे सविस्तर वेळापत्रक प्रवेशाच्या वेळी उपलब्ध होईल. तसेच वेळापत्रकाविषयीची आणखी माहिति उपप्राचार्यांकडे उपलब्ध होईल.**

---

**✻ तोंडी परीक्षा वेळापत्रक दिल्यानंतर वेळत देणे ही विद्यार्थ्याची जबाबदारी असेल.**

**✻ EVS परीक्षा व PE परीक्षा तसेच ज्या विषयांना प्रोजेक्ट आहेत त्या विषयांना Out of Turn नसल्याने विद्यार्थ्याने व पालकांनी लक्ष देणे आवश्यक आहे.**

**✻ इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांनी बोर्डाची Pre–List काळजीपूर्वक तपासावी.**

**✻ पालकांनी प्रत्येक परीक्षेनंतर एकदातरी प्रत्यक्षात विभागप्रमुखांना येऊन भेटणे आवश्यक आहे.**

## महाविद्यालयाची वसतिगृहे

महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये १८० विद्यार्थी व २०० विद्यार्थिनींची रहाण्याची सोय आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहात निवास व भोजनाची व्यवस्था आहे. दोन्ही वसतिगृह इमारती सुसज्ज व हवेशीर असून महाविद्यालयाशेजारीच आहेत. महाविद्यालय, वाचनालय, ग्रंथालय, क्रीडांगण ही सर्व महाविद्यालयानजिकच असल्यामुळे विद्यार्थी, विद्यार्थिनींना अतिशय सोयीस्कर आहेत. वसतिगृह प्रवेशाच्या अर्जाचा नमुना महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये मिळेल. वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी येताना सोबत पालकांनी येणे आवश्यक आहे. प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांने त्याबद्दल प्रत्यक्ष भेटून प्रवेश निश्चित करावा. वसतिगृहात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना / विद्यार्थिनींना आपला एक फोटो वसतिगृह प्रमुखांना सादर करावयाचा आहे. प्रत्येक सत्राच्या आरंभी वसतिगृहाच्या खोलीचे वाटप वसतिगृह प्रमुख करतील. वसतिगृहात राहण्यासंबंधीची नियमावली कार्यालयात मिळेल. त्या नियमांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. नियमभंग केल्यास गंभीर दखल घेतली जाईल. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असणारे नियम व वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना यांचे पालन बंधनकारक आहे.

वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांनी वा पालकांनी वसतिगृहाच्या नियमांचा विशेषतः पाल्यांना भेटण्याच्या वेळासंबंधीच्या नियमांचा परिचय करुन घ्यावा व तशी वर्तणूक ठेवावी.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी / विद्यार्थिनींनी महाविद्यालय परिसरातील महाराष्ट्र बँकेत स्वतःचे खाते उघडावे. सुट्टीमध्ये वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा आकार द्यावा लागतो. विद्यार्थी / विद्यार्थिनी यांनी वसतीगृहातील भोजनगृहातच भोजन घेणे अनिवार्य आहे. स्वतःची चीजवस्तूंची जबाबदारी वैयक्तिक विद्यार्थी / विद्यार्थिनींची आहे. तसेच वसतिगृहामध्ये विद्यार्थी / विद्यार्थिनींच्या ताब्यात दिलेल्या सामानाची मोड-तोड किंवा नासधुस झाल्यास त्याची नुकसान भरपाई संबंधित विद्यार्थी / विद्यार्थिनींकडून घेतली जाते. तसेच इमारती, दरवाजे, खिडक्या इ. ची मोडतोड, नासधूस केल्यास नुकसान भरपाई द्यावी लागते. वसतिगृहात वैयक्तिक रेडिओ, टी. व्ही, हीटर, इस्त्री इ. चा वापर करण्यास सक्त मनाई आहे. वरील वस्तुंचा वापर केल्याचे आढळल्यास वसतिगृह प्रवेश आपोआप रद्द केला जातो व योग्य ती कारवाईही केली जाते.

# सुयश अकॅडमी

विद्यार्थी दहावीला गेला की पालक आणि विद्यार्थी दोघांसाठीही महत्त्वाचा शब्द ठरतो तो त्या विद्यार्थ्यांचे करिअर म्हणजेच जीवन व्यवसाय. विज्ञान शाखेतील जवळजवळ ८० टक्के विद्यार्थ्यांचा कल इंजिनीयरिंग, मेडिकल, फार्मसी किंवा अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याचा असतो आणि यासाठी आपल्या कोकणासारख्या भागात उत्तम शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज निर्माण होते.

शासन स्तरावर बदललेल्या शैक्षणिक धोरणानुसार २००० सालापासून बारावीनंतर पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षांना विशेष महत्त्व आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बदलत्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये या सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांचे एकत्रित मार्गदर्शन करण्यासाठी सुयश अकॅडमी चालवली जाते. राजस्थान मधील कोटा येथील ZAP लर्निंग सोल्युशन्सच्या मार्गदर्शनाखाली या सुयश अकॅडमीचे कामकाज चालते. IIT, NIT, AIIMS, IISER, NISER, यांसारख्या देशभरातील नावाजलेल्या शिक्षण संस्थांमध्ये तसेच अन्य वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी गरजेच्या असलेल्या, JEE, NEET, NATA, MHT-CET, BITSAT, NIET, NDA या सर्व परीक्षांची तयारी एका छताखाली सुयश अकॅडमी मध्ये करून घेतली जाते. याचबरोबर एच.एस.सी बोर्ड परीक्षेच्या अभ्यासक्रमाची पूर्तता देखील इथे करून घेतली जाते त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाचतो.

विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शैक्षणिक सुविधा रत्नागिरी सारख्या ठिकाणी मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे सुयश अकॅडमी कारण स्मार्ट क्लासरूम, परस्पर संवादी अध्यापन (इंटर ॲक्टिव्ह टीचिंग), रोज सरावासाठी विशेष सत्र, आठवड्यात शिकवलेल्या भागावर विशेष चाचण्या आणि प्रात्यक्षिके, सराव चाचण्या झाल्यावर लगेचच विद्यार्थ्यांच्या गुणांचं विश्लेषण, गुणवत्ता पूर्ण अभ्यास साहित्य, या सर्व भौतिक सुविधा इथे उपलब्ध आहेत. याचबरोबर स्मार्ट क्लासरूमच्या शेजारीच साधन समृद्ध ग्रंथालय उपलब्ध आहे. व्यासंगी आणि अनुभवी शिक्षक वर्ग ही या अकॅडमीची अत्यंत लक्षवेधी बाब आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना वैयक्तिक शंका समाधानाची उत्तम संधी आहे. तसेच विद्यार्थ्यांचे गरजेनुसार आणि योग्य वेळी समुपदेशन केले जाते. वर्ग खोल्या वातानुकूलित आहेत आणि पालकांसाठी खुशखबर म्हणजे सर्व बाबी अत्यंत माफक फी मध्ये विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या सगळ्याचा परिपाक म्हणजे सुयश अकॅडमीचा प्रतिवर्षी लागणारा निकाल हा उत्साहवर्धक व भूषणावह असाच असेल. या संदर्भातील नियोजन प्रतिवर्षी काळजीपूर्वक केले जाते. तरी संबंधित इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा उपयोग करून घ्यायलाच हवा.

**प्राचार्य**
**संपर्क : प्रा. चेतन मालशे, समन्वयक (८९९९३८९३७८)**
**कु. अनुष्का शितूत, व्यवस्थापक (७२४९००६१२१)**

# समित्यांमधून व्यवस्थापनाकडे....

महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि त्यांच्या उत्तम व्यक्तिमत्व विकासासाठी विविध व्यासपीठे महाविद्यालय सतत उपलब्ध करून देत असते.

महाविद्यालयामध्ये कला, विज्ञान, वाणिज्य आणि एम.सी.व्ही.सी. या शाखांमध्ये दरवर्षी जवळ जवळ २८०० विद्यार्थी शिक्षण घेत असतात. त्यामुळे कॉलेजचा व्याप आणि पसारा मोठा आहे.अध्यापक संख्या भरपूर आहे आणि या सगळयांना एकत्रित बांधून ठेवणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्व कलागुणांना वाव देण्यासाठी कॉलेजमध्ये विविध समित्या अनेक वर्ष कार्यरत आहेत. प्रत्येक समिती स्वतःचे उद्दिष्ट ठरवून आणि स्वतःची कार्यकक्षा ओळखून त्यानुसार काम करते. विद्यार्थ्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयीन जीवनाची सुरुवात होते ती प्रवेश प्रक्रियेने. प्रवेश प्रक्रिया समिती अतिशय जोमाने दरवर्षीच कार्यरत असते. प्रशासकीय व्यवस्थापन समिती सर्व प्रशासकीय व्यवस्थापन पाहते. शिक्षकांना सतत अद्ययावत ठेवण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण समिती कार्यरत आहे. कॉलेजमध्ये दरवर्षी होणारे कार्यक्रम आणि समारंभ व्यवस्थित पार पाडणारी कार्यक्रम समिती, विद्यार्थ्यांना कमवा व शिका शिष्यवृत्ती योजनेची माहिती देणारी विद्यार्थी सहायता निधी समिती आहे. विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची विशेष आवड निर्माण व्हावी, त्यांनी केलेल्या लेखनाचे प्रकाशन व्हावे आणि त्यांच्यामधून लेखक, कवी घडावा यासाठी म्हणून सहकार हा वार्षिकांक दरवर्षी प्रकाशित केला जातो आणि हे काम सहकार समिती पाहते. तसेच विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व आणि अन्य लेखन कौशल्य विकसित व्हावे यासाठी वाङमय मंडळ देखील कार्यरत आहे. विद्यार्थी अनेक बाह्य स्पर्धांमध्ये सहभागी होऊन राज्यस्तरीय बक्षिसे मिळवतात. नाट्य, गायन, नृत्य इत्यादी कलांची आवड निर्माण व्हावी, यासाठी सांस्कृतिक मंडळ कार्यरत आहे. स्वातंत्र्य दिनानिमित्त दरवर्षी हे मंडळ देशभक्तीपर समूह गीत गायन स्पर्धेचे आयोजन करते. पर्यावरण जाणीव जागृती अभियान समिती ठिकठिकाणी क्षेत्रभेटी, निसर्ग भ्रमण आणि परिसंवादातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक जाणीव जागृती निर्माण करते. दिनविशेष समिती गुरुपौर्णिमा, शिक्षक दिन, वाचन प्रेरणा दिन, अल्पसंख्यांक हक्क दिन यांसारखे दिन साजरे करून विद्यार्थ्यांना विशेष दिवसांची माहिती देते.

विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयीन वयातच समाजसेवेची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना समाजाप्रती आपले ऋण फेडता यावेत यासाठी राष्ट्रीय सेवा योजना समिती कार्यरत आहे. यामधील विद्यार्थी राज्यस्तरीय शिबिरात देखील सहभागी होतात. विद्यार्थ्यांना भात लावणीचे खास प्रशिक्षण देण्यात येते. सात दिवसांचे निवासी शिबिर हे या योजनेचे मुख्य आकर्षण आहे. यामुळे विद्यार्थी स्वयंपूर्ण बनतात. महाविद्यालयांमध्ये शिस्तबद्ध देशभक्त आणि सक्षम नागरिक बनण्यासाठी आर्मी आणि नेव्हल एनसीसी कार्यरत आहे. आर्म फोर्स मध्ये बेसिक ट्रेनिंगची सुविधा उपलब्ध आहे आणि आर्मी आणि नेव्हल मध्ये नोकरीची संधी उपलब्ध होते.

विद्यार्थ्यांच्या आयुष्यात खेळाचे महत्व जबरदस्त आहे आणि जिमखाना व्यवस्थापन समिती विद्यार्थ्यांना खेळाच्या विविध संधी उपलब्ध करून देते. महाविद्यालयीन मुलींच्या गरजा ओळखून त्यांना योग्य मार्गदर्शन करणारी महिला विकास कक्ष समिती कार्यरत आहे. या समितीद्वारे पोषण युक्त खाऊचा डब्बा यांसारख्या स्पर्धा तसेच वयात येणाऱ्या मुलींना शारीरिक आणि मानसिक बदलांना सामोरे जाण्यासाठी विशेष व्याख्याने आयोजित केली जातात. समाजशास्त्राशी संबंधित इतिहास शोध आणि बोध अभियान समिती, वसुंधरा जिज्ञासा मंडळ समिती कार्यरत आहेत. विविध ठिकाणी क्षेत्रभेटी, सहली, व्याख्याने यांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये या विषयांची रुची ही मंडळे निर्माण करतात.सर्व शाखांमधील विद्यार्थ्यांना आपल्या विषयासंबंधित पोस्टर्स तयार करण्याचं कौशल्य विकसित व्हावं म्हणून पोस्टर प्रेझेंटेशन समिती विज्ञान दिनाच्या निमित्ताने पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित करते.

सर्व कलागुणांच्या विकासाबरोबरच शिक्षणाचं मुख्य उद्दिष्ट पास होऊन पुढच्या वर्गात जाणे हे असते आणि यासाठी महाविद्यालयात बोर्डाच्याधर्ती वर आधारित परीक्षा समिती तसेच शालेय मूल्यांकन प्रक्रिया, परीक्षा मूल्यमापन तांत्रिक सहाय्यक समिती उत्तमपणे कार्यरत आहे. यामुळे दरवर्षी महाविद्यालयाचा गुणात्मक आणि संख्यात्मक निकाल हा सतत वाढतच असतो. यांच बरोबर महाविद्यालयामध्ये सतत चालू होणाऱ्या सर्व उपक्रमांना योग्य प्रसिद्धी मिळावी यासाठी प्रसिद्धी समिती जोमाने कार्यरत असते. महाविद्यालयाची स्वतःची स्वतंत्र वेबसाईट देखील आहे.

या सर्वांबरोबर विद्यार्थ्यांना कॉलेज म्हटलं की गॅदरिंग हवेच, म्हणून कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या छंदांना अविष्कृत करण्यासाठी दरवर्षी डिसेंबरमध्ये छदोत्सवाचं आयोजन केलं जातं. पारंपारिक वेशभूषेतील शोभायात्रेने या सर्व कार्यक्रमांची सुरुवात होते. यामध्ये गीत गायन, एकांकिका, फॅन्सी ड्रेस, वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य, फूड फेस्टिवल, इत्यादींचे आयोजन आणि या संदर्भात स्पर्धा होतात.वाद्य वादन, कथाकथन, काव्यवाचन, शास्त्रीय संगीत यांची देखील छंदोत्सवात मेजवानी असते. याचबरोबर पेंटिंग, पोस्टर्स, छायाचित्रण, रील मेकिंग, कोलाज, रांगोळी, फाईन आट्‌र्स यांच्या सुद्धा स्पर्धा या महोत्सवात संपन्न होतात. यांच बरोबर छंदोत्सवाचं मुख्य आकर्षण असतं शामराव करंडक एकांकिका स्पर्धा. ही स्पर्धा गेली २६ वर्ष सुरू आहे. या स्पर्धेचा विशेष भाग म्हणजे लेखन, दिग्दर्शन, नैपथ्य, संगीत, पार्श्वसंगीत, प्रकाशयोजना हे सर्व घटक विद्यार्थीच सांभाळतात. **'शब्द एक अविष्कार अनेक'** असे या एकांकिकेचे स्वरूप असते. दरवर्षी या एकांकिकेसाठी एक शब्द दिला जातो. विद्यार्थी त्या **शब्दावर** आधारित एकांकिकेचे लेखन करतात आणि सादरीकरण होते. यापैकी निवडक एकांकिका विविध ठिकाणी यश मिळवतात. रंगमंचावरील सर्व घटकांना पारितोषिके देणारी ही प्रतिष्ठेची, सन्मानाची एकांकिका स्पर्धा आहे. माजी विद्यार्थ्यांना घंटानाद सन्मान, तसेच आजी विद्यार्थ्यांना **आदर्श विद्यार्थी** आणि **विद्यार्थिनी, अष्टपैलू विद्यार्थी**, तसेच **गोल्डन बॉय** अँड **गोल्डन गर्ल** अशी विशेष पारितोषिके पारितोषिक वितरण समारंभात दिली जातात.

**अशाप्रकारे अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाच्या कामकाजाचे उत्तमपणे व्यवस्थापन करण्यामध्ये या समित्यांचा मुख्य सहभाग आहे.**

## क्रीडास्पर्धा संबंधी माहिती

**कनिष्ठ महाविद्यालयातील ११ वी व १२ वी या वर्गातील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी महाराष्ट्र शासनातर्फे पावसाळी व हिवाळी या दोन सत्रांमध्ये खालील खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात येतात.**

| पावसाळी सत्र | हिवाळी सत्र |
|---|---|
| कबड्डी, खोखो, टेबलटेनिस, पोहणे, व्हॉलिबॉल, फूटबॉल | बास्केटबॉल, हॉकी, बॅडमिंटन, कुस्ती, जिमनॅस्टिक्स |

१. मैदानी स्पर्धा (ॲथलॅटीक्स) : १९ वर्षाखालील विद्यार्थी / विद्यार्थिनींना वरील खेळामध्ये भाग घेता येईल.

२. इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांना बोर्डाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार सवलतीचे गुण देण्यात येतील. त्यासाठी क्रीडा शिक्षकांशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

३. भविष्यात नोकरीच्या वेळी, वैद्यकीय शिक्षणक्रमामध्ये / खेळात भाग घेतलेल्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. ज्या विद्यार्थ्यांना वरील खेळामध्ये भाग घ्यावयाचा आहे, त्यांनी सोबतच्या अर्जात माहिती भरुन तो अर्ज प्रवेश अर्जासोबत द्यावा.

४. विविध क्रीडा प्रकारांचे संघ निवडण्यासाठी प्रथम चाचणी स्पर्धा घेण्यात येईल. संघात निवड झाल्यानंतर विद्यार्थ्यास तालुका, जिल्हा, विभागीय व राज्य स्तरावरील स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी बाहेर गावी जावे लागण्याची शक्यता आहे. ज्यांना बाहेरगावी जाणे शक्य होणार नाही, त्यांनी संघाच्या निवडीसाठी उपस्थित राहू नये. विद्यार्थ्यांना संघात प्रवेश दिल्यानंतर सर्व स्तरावर भाग घेणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.


# रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे
# कै. अरुअप्पा जोशी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण अकादमी

रत्नागिरीतील विद्यार्थ्यांचे सामान्य सरकारी नोकरी पासून ते अगदी कलेक्टर होईपर्यंतचे स्वप्न होणार इथे साकार !

**महाविद्यालयीन शिक्षण सुरु असतानाच स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणे झाले इथे अगदी सोपे ..**

आता UPSC/MPSC चा अभ्यास आपल्या रत्नागिरी शहरात सहज उपलब्ध ...

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अकादमीचे १९ विद्यार्थी सरकारी नोकरीमध्ये रुजू ....**

वैशिष्ट्ये

- Foundation Batch
- MPSC Integrated Batch
- Banking-Insurance-Staff Selection Commission Batch
- Police Selection Batch
- NET/SET Batch

उपलब्ध सुविधा

- स्पर्धा परीक्षांमध्ये स्वतः उत्तीर्ण झालेले तज्ञ व अनुभवी प्राध्यापक
- प्रशस्त व हवेशीर वर्ग खोली व अभ्यासिका
- समृद्ध ग्रंथालय, वाचनासाठी वर्तमानपत्रे, मासिके
- अभ्यासिका सकाळी ७.०० रात्री १०.०० पर्यंत खुली
- Wifi ची सुविधा

स्पृहणीय यश : उपजिल्हाधिकारी, नायब तहसिलदार, पोलिस उपनिरीक्षक, सरळसेवा (वर्ग २) अधिकारी, कर सहाय्यक, बँक ऑफिसर, बँक क्लर्क, कोकण रेल्वे, महावितरण, तलाठी, पोलिस कॉन्स्टेबल, आरोग्यसेवक या व अन्य अनेक पदांवर विद्यार्थ्यांची निवड

संपर्क : ८८०५५०६८८३ पत्ता : तळमजला, जे. एस. डब्ल्यू बिल्डिंग, गोगटे जोगळेकर महाविद्यालय, खातू नाट्य मंदिराच्या मागे, रत्नागिरी. E-mail : aruappa.acd@gmall.com.

# महाविद्यालय गीत

ज्ञानमंदिरात आणि अंतरात परिमळतो ।
अपरान्ती ज्ञानगंध हिरवळीवर दरवळतो ।। धृ ।।

सानथोर वृक्ष इथे । ज्ञानोत्सुक गाती गीते ।
तरुछाया देत इथे परंपरा जागवितो ।। १ ।।

रम्य इथे नंदनवन । शास्त्रांचे ज्ञानसदन ।
भाषांचा ज्ञान कुंभ चिंबचिंब भिजवितो ।। २ ।।

कलारंग इथे दंग । अर्थपूर्ण देती रंग ।
स्वर्णभूमी मैदानी ध्वज डौले फडफडतो ।। ३ ।।

तारांकित, मानांकित । यश इथले शुभसंचित ।।
ज्ञानार्णव ज्ञानियास नित्य इथे खुणवितो ।। ४ ।।

गीतकार - डॉ. श्रीकृष्ण जोशी,
माजी उपप्राचार्य, अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी